# दिशाहीन

झाडावरून गळून पडलेल्या पानागत..
दिशाहीन गेला दिवस...

असंख्य धाग्यांनी जोडलेले असतात ते,
मनाच्या आणि शरीराच्या सुध्दा !
पावसा-पाण्यात, उन्हाच्या तलखीत..
एकमेकांचीच तर साथ असते..

पण रुजलेले, आकाराला आलेले प्रत्येक नाते-
तुटतेच कधी ना कधी...

झाडाला तटस्थ होवून उभे राहावे लागते..
मनाला कितीही क्लेश होत असले तरीही,
मोकळी करावीच लागते पानाची गाठ..
कारण एकत्र प्रवास आता संपलेला असतो....

तुझे आणि माझे झाले असेच काहीसे...
केवळ झाड कोण आणि पान कोण -
ते ठरवता नाही आले - शेवटपर्यंत,
त्यामुळे कोण तुटले कोणापासून...
हे त्या एका देवालाच ठाऊक !

काही का असेना...

मनाची सांगता ना येण्यासारखी घुसमट..
आणि अर्धवट श्वासांच्या येरझाऱ्यात
दिशाहीन गेला दिवस,
एवढे मात्र खरे...

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**